मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!
: 9834138482



# जिल्हा रुग्णालयाला सुपरस्पेशालिटीचा 'बूस्टर डोस'

## जिल्हा रुग्णालयासाठी २०० खाटांचे अत्याधुनिक सुपरस्पेशालिटी रुग्णालय मंजूर

» पिंपरी | प्रतिनिधी

**जिल्हा रुग्णालयात २०० खाटांचे अत्याधुनिक सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यास मंत्रिमंडळाने (दि. ८) मंजुरी दिली आहे. या रुग्णालयासाठी ७७२ पदांची निर्मिती, अत्याधुनिक वैद्यकीय यंत्रसामग्री, पायाभूत सुविधा आणि निधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामुळे जिल्हा रुग्णालयाच्या सक्षमीकरणाला मोठी चालना मिळणार आहे अशी माहिती आमदार शंकर जगताप यांनी दिली. दरम्यान जिल्हा रुग्णालयामध्ये ४०० खाटा वाढवण्यात याव्या अशी आग्रही मागणी आहे ,यासाठी देखील पाठपुरावा सुरू आहे .**



“जिल्हा रुग्णालयात २०० खाटांचे सुपरस्पेशालिटी रुग्णालय उभारण्यास मंत्रिमंडळाने दिलेली मंजुरी हा सर्वसामान्य रुग्णांसाठी अत्यंत दिलासादायक निर्णय आहे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा रुग्णालय आधुनिक, सक्षम आणि सर्व सुविधांनी परिपूर्ण 'सुपरस्पेशालिटी ' केंद्र म्हणून विकसित होत आहे. पदनिर्मिती, निधी आणि अत्याधुनिक यंत्रसामग्रीबाबत घेण्यात आलेल्या निर्णयांमुळे गंभीर आजारांवरील दर्जेदार उपचार स्थानिक पातळीवर उपलब्ध होतील. या प्रकल्पासाठी सातत्याने पाठपुरावा केला असून, तो निर्धारित वेळेत पूर्ण व्हावा यासाठी पुढेही प्रयत्नशील राहणार आहे.

- शंकर जगताप, आमदार, चिंचवड विधानसभा मतदारसंघ

रुग्णालयातील बेडची क्षमता वाढविण्यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यासोबतच जिल्ह्यातील नागरिकांना माफक, दर्जेदार आणि अत्याधुनिक आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन दिले होते. या निर्णयामुळे नागरिकांना दिलेल्या आश्वासनाची पूर्तता होऊन गंभीर आजारांवरील उपचार आता शहरातच उपलब्ध होणार असल्याचे आमदार जगताप यांनी नमूद केले.

सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक नागरीकेंद्रित करण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत 'प्रगती' आरोग्य सुधारणा प्रकल्प राबविण्यास मंगळवारी मंत्रिमंडळाने मान्यता दिली. तब्बल ४ हजार २५० कोटी रुपयांचा हा प्रकल्प असणार आहे. यामधून जिल्हा रुग्णालयांना बळकटी मिळणार आहे. या प्रकल्पातून फक्त पायाभूत सुविधा उभारण्याऐवजी जिल्हा आरोग्यसेवेला 'मल्टी स्पेशलिटी हब' म्हणून ओळख मिळावी .

रुग्णांना सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा वेळेवर आणि अचूक पद्धतीने मिळतील यावर भर दिला जाणार आहे. आरोग्य सेवेच्या उपलब्धतेचे बरोबर उपचारांचा खर्च नागरिकांच्या आवाक्यात रहावा यावरही या प्रकल्पातून भर दिला जाणार आहे. प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा आणि वेळेवर निदान झाल्यानंतर आजाराचे गांभीर्य वाढण्यापूर्वी त्यावर उपचार घेणे यामुळे रुग्णांना शक्य होईल. या माध्यमातून राज्यातील जिल्हा रुग्णालयांमध्ये आधुनिक यंत्रसामग्री, डिजिटल आरोग्य सुविधा आणि दर्जेदार उपचार व्यवस्था उभारण्यावर भर दिला जाणार आहे.

दरम्यान राज्य मंत्रीमंडळाने प्रगती प्रकल्पांतर्गत पुणे जिल्ह्यासाठी २०० खाटांचे सुपर स्पेशलिटी रुग्णालय सुरू करण्यासाठी मंजुरी दिली आहे. तसेच कोल्हापूर आणि नांदेड येथे ५०० खाटांची, नागपूर आणि लातूर येथे ३०० खाटांची जिल्हा रुग्णालय उभारण्याचे प्रस्तावित आहे. या पाच रुग्णालयांसाठी एकूण २ हजार ४३० पदे निर्माण करण्याचे ही मंजुरी देण्यात आले आहे. जिल्हा रुग्णालयाच्या सक्षमीकरणासाठी आमदार शंकर जगताप यांनी शासनस्तरावर सातत्याने पाठपुरावा केला होता.

याच अंतर्गत (दि. ८) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा रुग्णालयाचे सुपरस्पेशालिटी आरोग्य केंद्रात रूपांतर करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे. नवीन सुपरस्पेशालिटी सुविधेमुळे हृदयरोग, कर्करोग, मेंदू व मज्जासंस्थेचे आजार, मूत्रपिंडविकार यांसारख्या गंभीर आजारांवरील उपचार एकाच ठिकाणी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे. सर्वसामान्य रुग्णांना महागड्या खासगी रुग्णालयांत अथवा उपचारांसाठी दूरवर जाण्याची गरज कमी होणार असून, जिल्हा रुग्णालय अधिक सक्षम, आधुनिक आणि रुग्णाभिमुख होणार असल्याचे आमदार शंकर जगताप म्हणाले.

# खड्ड्यांत चिखली! पाटील नगर, सोनावणे वस्तीचे रस्ते रखडले!

» पिंपरी | प्रतिनिधी

**चिखली येथील पाटील नगर आणि सोनावणे वस्ती परिसरातील मुख्य रस्त्यांची कामे गेल्या अनेक महिन्यांपासून अर्धवट स्थितीत रेंगाळली असून, यामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यांवर ठिकठिकाणी पडलेले मोठे खड्डे, पसरलेली खडी आणि धुळीच्या साम्राज्यामुळे या भागातून ये-जा करणे धोकादायक बनले आहे. टाऊन हॉलच्या बाजूने सोनावणे वस्ती आणि गावठाणाकडे जाणाऱ्या मार्गासह पाटील नगरमधील अंतर्गत रस्त्याची दुरवस्था झाली असून, दुचाकी घसरून अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेक महिन्यांपूर्वी रस्त्याचे खोदकाम करून ठेवण्यात आले, मात्र त्यानंतर काम संथ गतीने सुरू असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.**





"पाटील नगर आणि सोनावणे वस्ती रस्त्यावरील युटिलिटी, ड्रेनेज आणि पाणीपुरवठ्याची सर्व कामे पूर्ण करून रस्त्याचा बेस तयार करण्यात आला आहे. पावसाळ्यामुळे डांबर प्लँट बंद असून खडी ओली असल्याने हीटिंगसाठी अडचण येत आहे. डांबर उपलब्ध होताच आणि पावसाने उघडीप देताच डांबरीकरणाचे अंतिम काम पूर्ण केले जाईल."

- शिवाजी चौरे, अभियंता, स्थापत्य विभाग

"रस्त्याचे रखडलेले काम तातडीने पूर्ण करून नागरिकांची त्रासातून लवकरात लवकर मुक्तता करावी, यासाठी महापालिका प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा सुरू आहे."

- यश साने, नगरसेवक

" या भागातील रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे ज्येष्ठ नागरिक आणि महिलांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असून, प्रशासनाने पावसाचे कारण पुढे न करता तातडीने डांबरीकरण काम मार्गी लावावे."

- संगीता ताम्हाणेरे, नगरसेविका

प्रशासनाने दिलेल्या माहितीनुसार, या रस्त्यांच्या कामात सुरुवातीला जागेच्या भूसंपादनावरून स्थानिक पातळीवर विरोध झाला होता. मात्र, महापालिकेने कारवाई करून आवश्यक जागा ताब्यात घेतली असून रस्त्याचा पाया (बेस) आणि क्रश लेव्हलचे काम पूर्ण केले आहे. तसेच रस्त्याखालील आवश्यक ड्रेनेज लाईन, पाणीपुरवठ्याच्या पाईपलाईन आणि विविध युटिलिटी वाहिन्या टाकण्याचे कामही मार्गी लागले आहे. केवळ अंतिम टप्प्यातील डांबरीकरणाचे काम बाकी असून, सध्या सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे डांबर प्लँटवरील खडी ओली असल्याने हीटिंग प्रक्रियेत तांत्रिक अडचणी येत आहेत. त्यामुळे डांबरीकरणाचे काम थांबले असून पाऊस थांबताच हे काम युद्धपातळीवर पूर्ण केले जाईल, असा दावा प्रशासनाने केला आहे.

# महापालिकेच्या कल्याणकारी योजनांची अर्ज प्रक्रिया सुरू!

## महापालिका योजनांची अर्ज प्रक्रिया सुरू; महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते शुभारंभ!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांच्या अर्ज स्वीकृती प्रक्रियेचा शुभारंभ करण्यात आला. महानगरपालिका क्षेत्रातील महिला, बालके, दिव्यांग व्यक्ती, मागासवर्गीय तसेच गरजू व वंचित घटकांतील पात्र लाभार्थ्यांना विविध योजनांचा लाभ सुलभपणे उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने अर्ज प्रक्रिया अधिक सुटसुटीत व नागरिकाभिमुख करण्यावर भर देण्यात आला आहे.**



समाज विकास विभागामार्फत विविध घटकांच्या सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी महानगरपालिकेच्या स्तरावर विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतात. या योजनांची माहिती सर्व पात्र लाभार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविणे, अर्ज प्रक्रियेबाबत आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून देणे तसेच विहित निकषांनुसार पात्र लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

अर्ज प्रक्रियेदरम्यान नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण उद्भवू नये, यासाठी आवश्यक उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ऑनलाईन पद्धतीने अर्ज स्वीकारण्याबरोबरच आवश्यकतेनुसार ऑफलाईन अर्ज स्वीकारण्याची सुविधा उपलब्ध करून देण्याबाबतही संबंधित विभागाला सूचना देण्यात आल्या. विशेषतः डिजिटल माध्यमांचा वापर करताना अडचणी येणारे नागरिक, ज्येष्ठ नागरिक तसेच दिव्यांग व्यक्तींना अर्ज प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध करून देण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले.

अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे, पात्रतेचे निकष, अर्ज सादर करण्याची कार्यपद्धती तसेच योजनांशी संबंधित आवश्यक माहिती नागरिकांना स्पष्ट व सुलभ स्वरूपात उपलब्ध करून देण्यावरही भर देण्यात आला. अर्जातील त्रुटी अथवा तांत्रिक अडचणींमुळे पात्र लाभार्थी योजनांच्या लाभापासून वंचित राहणार नाहीत, याची संबंधित विभागाने दक्षता घ्यावी. तसेच नागरिकांना अर्ज प्रक्रियेसाठी अनावश्यकपणे कार्यालयात वारंवार येण्याची आवश्यकता भासणार नाही, यासाठी आवश्यक प्रशासकीय व्यवस्था सुनिश्चित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून महिला व बालकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासोबतच पात्र लाभार्थ्यांपर्यंत योजनांची माहिती पोहोचविण्यासाठी आवश्यक जनजागृती करण्यावर भर देण्यात येणार आहे.

प्राप्त अर्जांची विहित निकषांनुसार छाननी करणे, पात्र लाभार्थ्यांची निवड नियमानुसार करणे तसेच मंजूर योजनांचा लाभ संबंधित लाभार्थ्यांना निर्धारित कालमर्यादेत उपलब्ध करून देण्यासाठी समाज विकास विभागाने नियोजनबद्ध कार्यवाही करावी, असेही यावेळी सांगण्यात आले. अर्ज स्वीकृतीपासून ते लाभ वितरणापर्यंतच्या प्रक्रियेत पारदर्शकता, सुलभता आणि गतिमानता राखण्याच्या सूचनाही संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

> "महानगरपालिकेमार्फत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजनांचा लाभ प्रत्येक पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. माहितीचा अभाव, तांत्रिक अडचणी किंवा अर्ज प्रक्रियेतील अडथळ्यांमुळे कोणताही पात्र नागरिक लाभापासून वंचित राहू नये. त्यासाठी संबंधित विभागांनी योजनांची प्रभावी जनजागृती करून अर्ज प्रक्रिया सुलभ व पारदर्शक ठेवावी. प्राप्त अर्जांवर विहित कार्यपद्धतीनुसार वेळेत कार्यवाही करून पात्र लाभार्थ्यांना योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यास प्राधान्य द्यावे."
>
> -रवि लांडगे, **महापौर, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका**

> "महिला व बालकांच्या सामाजिक व आर्थिक सक्षमीकरणाच्या दृष्टीने महानगरपालिकेमार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांची माहिती पात्र महिला व लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे तसेच अर्ज प्रक्रियेसाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. माहितीच्या अभावामुळे किंवा तांत्रिक अडचणींमुळे कोणताही पात्र लाभार्थी योजनेपासून वंचित राहणार नाही, यासाठी महिला व बालकल्याण समिती आणि प्रशासन यांच्यात आवश्यक समन्वय ठेवून योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येईल."
>
> – राणी पठारे, **सभापती, महिला व बालकल्याण समिती**

याप्रसंगी उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, महिला व बालकल्याण समिती सभापती राणी पठारे, समिती सदस्या पल्लवी जगताप, रेशमा भुजबळ, निता पाडाळे, सुप्रिया चांदगुडे, सारिका मासुळकर, मनिषा लांडे, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे यांच्यासह समाज विकास विभागाचे अधिकारी व संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

समाज विकास विभागामार्फत सन २०२६-२७ मध्ये राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजनांसाठी पात्र नागरिकांनी विहित मुदतीत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत. तसेच संबंधित योजनांची पात्रता व अटींची माहिती घेऊन महानगरपालिकेच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# पवना जलवाहिनीवर सकारात्मक तोडगा काढावा – महापौर रवि लांडगे

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड शहराच्या दीर्घकालीन पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या पवना जलवाहिनी प्रकल्पाबाबत मावळमधील शेतकरी तसेच संबंधित घटकांच्या अडचणी व भूमिका विचारात घेऊन समन्वयातून सकारात्मक आणि सर्वमान्य तोडगा काढावा. तसेच या विषयावरील पुढील कार्यवाहीसाठी मा. मुख्यमंत्री महोदयांची वेळ घेऊन बैठक आयोजित करण्याचे नियोजन करावे, अशी सूचना महापौर रवि लांडगे यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना केली.**



आज दिशा समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात आले असता महापौर रवि लांडगे यांनी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांची भेट घेतली. यावेळी पवना जलवाहिनी प्रकल्पासंदर्भात यापूर्वी झालेल्या बैठकीतील चर्चा, मावळ भागातील शेतकऱ्यांनी मांडलेल्या विविध अडचणी तसेच प्रकल्पाच्या पुढील कार्यवाहीबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पवना जलवाहिनी प्रकल्पाच्या अनुषंगाने मावळमधील शेतकरी व संबंधित घटकांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहणे आवश्यक आहे. यापूर्वी शेतकऱ्यांसमवेत झालेल्या चर्चेमध्ये त्यांच्या विविध अडचणी व अपेक्षा समोर आल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने संबंधित शेतकरी, स्थानिक नागरिक आणि सर्व संबंधित यंत्रणांशी आवश्यक समन्वय साधून त्यांच्या अडचणींचा योग्य विचार करावा आणि सकारात्मक तोडगा काढण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, अशी सूचना महापौर लांडगे यांनी जिल्हाधिकाऱ्यांना केली.

पिंपरी-चिंचवड शहराचा झपाट्याने होणारा विस्तार आणि वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहरासाठी दीर्घकालीन व शाश्वत पाणीपुरवठ्याचे नियोजन करणे अत्यावश्यक आहे. त्या दृष्टीने पवना जलवाहिनी प्रकल्प महत्त्वाचा असून, प्रकल्प पुढे नेताना मावळमधील शेतकरी आणि स्थानिक नागरिकांच्या प्रश्नांचाही योग्य विचार होणे आवश्यक आहे. शहराची पाण्याची गरज आणि स्थानिक शेतकऱ्यांचे हित या दोन्ही बाबींमध्ये समन्वय साधून सर्वमान्य मार्ग काढण्याची भूमिका असल्याचे महापौर लांडगे यांनी स्पष्ट केले.

> "पवना जलवाहिनी प्रकल्प हा पिंपरी-चिंचवड शहराच्या भविष्यातील पाणीपुरवठ्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे. त्याचवेळी मावळमधील शेतकऱ्यांनी मांडलेल्या अडचणी आणि त्यांच्या अपेक्षांचाही संवेदनशीलतेने विचार होणे आवश्यक आहे. कोणावरही अन्याय होणार नाही, अशा पद्धतीने सर्व संबंधित घटकांना विश्वासात घेऊन सकारात्मक आणि सर्वमान्य तोडगा काढण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या स्तरावर पुढील बैठक आयोजित करून विषयाला गती देण्याच्या दृष्टीने जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्याशी चर्चा केली आहे. शहराची दीर्घकालीन पाण्याची गरज पूर्ण करण्याबरोबरच शेतकऱ्यांच्या हिताचे संरक्षण व्हावे, यासाठी सातत्याने पाठपुरावा करण्यात येईल," असे महापौर रवि लांडगे यांनी सांगितले."
>
> - रवि लांडगे, **महापौर**

यापूर्वी झालेल्या बैठकीतील चर्चेच्या अनुषंगाने आता पुढील निर्णयप्रक्रियेला गती मिळणे आवश्यक आहे. त्यासाठी मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली संबंधित विभाग, जिल्हा प्रशासन, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका तसेच अन्य संबंधित यंत्रणांची संयुक्त बैठक आयोजित झाल्यास प्रलंबित मुद्द्यांवर चर्चा करून पुढील कार्यवाहीची निश्चित दिशा ठरविता येईल. त्यानुसार मा. मुख्यमंत्री महोदयांची वेळ घेऊन पुढील बैठकीचे नियोजन करण्याची विनंती जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना करण्यात आली.

# पिंपरी-चिंचवडच्या 50 वर्षांच्या विकासाचे व्हिजन; सूर्यवंशींचे कौतुक

## शहराच्या विकासासाठी पाणी, वाहतूक, कचरा, विविध प्रकल्पांचे दीर्घकालीन नियोजन

» पिंपरी | प्रतिनिधी

**विरोध नोंदवताना प्रत्येकाने संवैधानिक मार्गांचा अवलंब केला पाहिजे. अन्यथा अराजकाची परिस्थिती निर्माण होऊ शकते, असा इशारा महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर यांनी दिला. मराठी पत्रकार संघाच्या वतीने आयोजित विशेष सन्मान सोहळ्यास महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर, आमदार अमित गोरखे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, विक्रांत बगाडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी, लोकमतचे संपादक संजय आवटे, दैनिक पुढारीचे संपादक सुनील माळी, लेट्स अप मराठीचे संपादक योगेश कुटे, पुढारी माध्यम समूहाच्या सहसंपादिका मृणालिनी नानिवडेकर, न्यूज 18 मराठीचे सहसंपादक विशाल परदेशी यांच्यासह विविध माध्यम समूहांचे पत्रकार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



या सोहळ्यात विधानसभा अध्यक्ष ॲड. राहुल नार्वेकर आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांचा ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते पद्मश्री गिरीश प्रभुणे यांच्या हस्ते मानपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना राहुल नार्वेकर बोलत होते. यावेळी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पिंपरी चिंचवड शहराच्या पुढील ५० वर्षांच्या शाश्वत विकासाचे व्हिजन संगणकीय सादरीकरणाद्वारे मांडले.

राहुल नार्वेकर यांनी पिंपरी चिंचवडच्या विकासाचे कौतुक करताना सांगितले की, पिंपरी चिंचवड हे आशिया खंडात आणि जगभरात नावाजलेले तसेच वेगाने विकसित होणारे शहर आहे. शहरातील पायाभूत सुविधा आणि नागरी सोयी-सुविधा उल्लेखनीय आहेत. मात्र, भविष्यातील गरजा आणि वाढते शहरीकरण यांची सांगड घालणे आवश्यक आहे. उपलब्ध नागरी सुविधांचा सर्वांगीण विचार करून पिंपरी चिंचवडच्या सूक्ष्म आणि नियोजनबद्ध विकासाचे मॉडेल तयार करण्याचे उद्दिष्ट आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी समोर ठेवले आहे. या उद्दिष्टाच्या दिशेने ते निश्चितपणे यशस्वी वाटचाल करतील आणि शहराला विकासाची नवी उंची प्राप्त करून देतील.

बऱ्याच वर्षांनंतर पिंपरी चिंचवड शहरात येण्याची संधी मिळाली. पूर्वी गावाच्या स्वरूपात असलेल्या या परिसराने गेल्या काही दशकांत अत्यंत प्रभावशाली आणि विकसित शहर म्हणून घेतलेली झेप ही केवळ महाराष्ट्रासाठी नव्हे, तर संपूर्ण आशियासाठी एक उत्तम उदाहरण आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही आशियातील नावाजलेल्या महानगरपालिकांपैकी एक असून, वेगाने होणारे शहरीकरण अधिक नियोजनबद्ध आणि शाश्वत पद्धतीने कसे करता येऊ शकते, याचे उत्तम उदाहरण या शहरातून पाहायला मिळते, असेही त्यांनी सांगितले.

शहराचा विकास केवळ पायाभूत सुविधांच्या निर्मितीपुरता मर्यादित नसतो. वाढत्या शहरीकरणासोबत नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे, प्रशासन अधिक सक्षम करणे आणि नागरिकांच्या अपेक्षांना प्रतिसाद देणे आवश्यक आहे. या दृष्टीने पिंपरी चिंचवडमध्ये होत असलेले काम महत्त्वपूर्ण आहे, असे राहुल नार्वेकर यांनी नमूद केले.

या कार्यक्रमात राहुल नार्वेकर यांची प्रकट मुलाखतही रंगली. विविध माध्यमांच्या संपादकांनी विचारलेल्या प्रश्नांना राहुल नार्वेकर यांनी दिलखुलास उत्तरे देत जोरदार फटकेबाजी केली.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी सन्मान स्वीकारताना म्हणाले, पिंपरी चिंचवड शहराने मला आपल्यात सामावून घेतले आहे. या शहराचा नावलौकिक अधिक उंचावत असताना त्याचा सर्वांगीण आणि शाश्वत विकास साधणे हे माझ्यासमोरील प्रमुख उद्दिष्ट आहे. आज मिळालेल्या या सन्मानामुळे माझ्या जबाबदारीची जाणीव अधिक दृढ झाली असून, शहराच्या विकासासाठी निश्चितपणे प्रयत्नांची पराकाष्ठा करेन.

### पुढील ५० वर्षांसाठी पिंपरी चिंचवडचा विकास आराखडा!

यावेळी संगणकीय सादरीकरणाद्वारे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पिंपरी चिंचवड शहराच्या पुढील ५० वर्षांच्या शाश्वत, नियोजित आणि दीर्घकालीन विकासाचे विविध पैलू मांडले.

यामध्ये आगामी ५० वर्षांसाठी पाणीपुरवठ्याचे दीर्घकालीन नियोजन, महापालिका हद्दीतील उंचावरील पाणीसाठे, पवना व इंद्रायणी नदीकाठ विकास प्रकल्प, ड्रेनेज मास्टर प्लॅन, पुढील २५ वर्षांसाठी शाश्वत घनकचरा व्यवस्थापन, महापालिकेच्या ताब्यात आलेल्या आरक्षित जागांची सद्यस्थिती व भविष्यातील विकास योजना, सार्वजनिक वाहतूक व्यवस्था, शहरी नाले सुधारणा प्रकल्प, डीपी रस्ते, डेटा सेंटर धोरण आराखडा आणि पार्किंग धोरण यांचा समावेश आहे.

### सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव!

या कार्यक्रमात सामाजिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल राष्ट्रीय श्रमिक आघाडीचे संस्थापक अध्यक्ष यशवंत भोसले, एसएनबीपी स्कूलचे अध्यक्ष डी. के. भोसले, महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे अध्यक्ष बाबा कांबळे, महाराष्ट्रातील पहिले मीडिया टॉवर उभारणारे औटी ग्रुपचे अध्यक्ष बाबासाहेब औटी आणि 'दान से उडान' उपक्रम यशस्वीपणे राबविणारे रवी घाटे यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

---

# शहरात बेकायदेशीरपणे राहणाऱ्या नायजेरियन महिलेवर पोलिसांची कारवाई!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या विशेष शाखा-२ अंतर्गत परकीय नागरिक नोंदणी विभागाने बेकायदेशीररित्या वास्तव्यास असलेल्या एका नायजेरियन महिलेवर कारवाई करून तिला तिच्या मायदेशी हद्दपार केले आहे.**



हिंजवडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक परदेशी महिला बेकायदेशीरपणे राहत असल्याची गोपनीय माहिती परकीय नागरिक नोंदणी विभागाला प्राप्त झाली होती. त्यानुसार विभागाने संबंधित महिलेची चौकशी केली असता तिच्याकडे वैध पासपोर्ट व व्हिसा नसल्याचे आढळून आले. त्यानंतर तिची बायोमेट्रिक पडताळणी ऑनलाईन डीपीएम प्रणालीद्वारे करण्यात आली.

पडताळणीत संबंधित महिलेचे नाव गिफ्ट ओकोह (GIFT OKOH) असून ती नायजेरिया देशाची नागरिक असल्याचे निष्पन्न झाले. ही महिला २३ सप्टेंबर २०१४ रोजी वैद्यकीय व्हिसावर भारतात आली होती. जयपूर व पालघर येथे वास्तव्यानंतर ती पिंपरी-चिंचवड परिसरात राहत होती. मात्र, तिच्या पासपोर्ट व व्हिसाची मुदत संपल्यानंतरही ती भारतात वास्तव्यास असल्याचे तपासात उघड झाले.

संबंधित महिलेकडे कोणतीही वैध कागदपत्रे नसल्याने तिला मायदेशी परत पाठविण्यासाठी नायजेरियन उच्चायुक्तालय, नवी दिल्ली यांच्याकडून इमर्जन्सी ट्रॅव्हल डॉक्युमेंट तसेच एफआरआरओ मुंबई कार्यालयाकडून एक्झिट परमिट प्राप्त करण्यात आले.

यानंतर ८ सप्टेंबर २०२६ रोजी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून संबंधित महिलेला नायजेरिया येथे डिपोर्ट (हद्दपार) करण्यात आले. पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीत अवैधरित्या वास्तव्यास असलेल्या परदेशी नागरिकांचा शोध घेऊन त्यांच्यावर पुढेही कारवाई सुरू राहणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, पोलीस सहआयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर पोलीस आयुक्त सारंग आवाड व डॉ. बसवराज तेली, पोलीस उपायुक्त धीरज पाटील आणि सहायक पोलीस आयुक्त सुनील पंधरकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. विशेष शाखा-२ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय नरवाड, सहायक पोलीस निरीक्षक राजश्री पावरा तसेच त्यांच्या पथकाने ही कारवाई यशस्वीरीत्या पार पाडली.

# पिंपरी-चिंचवडची पाण्याची चिंता मिटणार!

## ठोकरवाडीवर प्रशासनाचा डोळा; ४०% पाणीगळती रोखण्यासाठी स्मार्ट मीटरिंग

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड शहराची वाढती लोकसंख्या आणि भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन महापालिका प्रशासनाने जलस्रोत वाढविण्याच्या हालचाली वेगाने सुरू केल्या आहेत. पवना, आंद्रा आणि भामा आसखेड धरणानंतर आता लोणावळ्याजवळील ठोकरवाडी धरणातून तब्बल ६०० एमएलडी पाणी शहरासाठी आणण्याचे नियोजन करण्यात येत आहे. यासाठी शासनाच्या जलसंपदा विभागाकडे पाठपुरावा सुरू असल्याची माहिती महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिली.**



सध्या पवना धरणातून शहराला सुमारे ५५० एमएलडी पाणीपुरवठा केला जात आहे. आंद्रा धरणातून निजोघे येथील इंद्रायणी नदीवरील बंधाऱ्यावरून १०० एमएलडी, तर एमआयडीसीकडून ३० एमएलडी शुद्ध पाणी घेतले जाते. भामा आसखेड धरणातून भूमिगत जलवाहिनीद्वारे १६७ एमएलडी पाणी आणण्याचे काम सुरू असून, हे पाणी फेब्रुवारी २०२७ पर्यंत शहराला उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

दरम्यान, तब्बल १ हजार २०० कोटी रुपये खर्चाच्या पवना बंद जलवाहिनी प्रकल्पाकडेही प्रशासनाचे लक्ष आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर शहराला सुमारे ७५० एमएलडी पाणी उपलब्ध होण्याचा दावा आयुक्तांनी केला. या प्रकल्पासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली लवकरच मुंबईत बैठक होणार असून, शेतकऱ्यांना विश्वासात घेऊन प्रकल्प मार्गी लावण्याचे नियोजन आहे. सुमारे ३५ किलोमीटर लांबीची ही जलवाहिनी असणार आहे.

आंद्रा धरणातून थेट पाणी आणण्यासाठी भूमिगत जलवाहिनी सुरू करण्याची निविदाही लवकरच प्रसिद्ध केली जाणार आहे. या माध्यमातून आणखी १०० एमएलडी शुद्ध पाणी शहराला मिळणार आहे. त्याचबरोबर ठोकरवाडी धरणातून ६०० एमएलडी पाणी उपलब्ध करून देण्याबाबत जलसंपदा विभागाकडे पाठपुरावा सुरू आहे. ठोकरवाडी धरणाचा सध्या जलविद्युत निर्मितीसाठी वापर केला जातो. एकीकडे नवीन जलस्रोतांचा शोध सुरू असताना दुसरीकडे शहरातील पाणीगळती रोखण्याचे मोठे आव्हान महापालिकेसमोर आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा व्यवस्थेतून तब्बल ४० टक्के पाणीगळती होत असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. ही गळती रोखण्यासाठी शहरातील एक लाख घरगुती नळजोडण्यांवर स्मार्ट वॉटर मीटरिंग प्रणाली लागू करण्यात येणार आहे.

जुन्या जलवाहिन्या बदलून सुमारे २५० किलोमीटर लांबीचे नवीन जलवाहिनीचे जाळे उभारण्यात येणार आहे. तसेच, पाणीपुरवठा वितरण व्यवस्था अधिक सक्षम आणि अचूक करण्यासाठी स्कॉडा प्रणालीची (SCADA) अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यामुळे भविष्यातील पाण्याची गरज भागविण्यासोबतच उपलब्ध पाण्याचा काटेकोर वापर करण्यावर महापालिकेचा भर राहणार आहे.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी चिंचवड येथील ऑटो क्लस्टरमधील कार्यक्रमात बोलताना शहराच्या आगामी पाणी नियोजनाची ही माहिती दिली.

### पाण्यासाठी महापालिकेची मोठी तयारी!

भविष्यातील पाण्याची गरज लक्षात घेऊन महापालिकेने जलस्रोत वाढविण्यासोबतच पाणीगळती रोखण्यावर भर दिला आहे. ठोकरवाडी धरणातून ६०० एमएलडी पाणी आणण्याचे नियोजन, एक लाख नळजोडण्यांना स्मार्ट मीटरिंग आणि २५० किलोमीटर नव्या जलवाहिन्यांचे जाळे उभारण्याची तयारी करण्यात येत आहे.

---

# स्मार्ट मीटरलाही ‘चकवा’! भोसरीत १९ वीजचोरीची प्रकरणे उघड; नऊ जणांवर गुन्हे

» पिंपरी | प्रतिनिधी

**स्मार्ट मीटरमध्ये छेडछाड करून वीजचोरी करणाऱ्या ग्राहकांविरोधात महावितरणने भोसरी परिसरात धडक कारवाई केली आहे. भोसरी, आकुर्डी आणि प्राधिकरण वीज उपविभागात स्मार्ट मीटरचे सील तोडणे, ‘सीटी बायपास’ करून मीटरची गती कमी करणे अशा प्रकारे वीजचोरी केल्याची तब्बल १९ प्रकरणे उघडकीस आली आहेत. यापैकी नऊ प्रकरणांत गुन्हे दाखल करून १२ लाख ४१ हजार रुपयांची दंडात्मक आकारणी करण्यात आली आहे.**



महावितरणच्या स्मार्ट तपासणी यंत्रणेमुळे भोसरी विभागातील वीजचोरीचे हे प्रकार उघडकीस आले आहेत. नियमित वीजवापराच्या तुलनेत अचानक कमी झालेला वापर, मीटरच्या रेकॉर्डमध्ये आढळणाऱ्या तफावती तसेच तपासणीदरम्यान करण्यात आलेली प्रत्यक्ष पाहणी यामधून मीटरमध्ये छेडछाड केल्याचे स्पष्ट झाले. काही ग्राहकांनी मीटरचे कव्हर उघडून सील तोडले होते, तर काही ठिकाणी ‘सीटी बायपास’ करून मीटरमधून प्रत्यक्ष वापरल्या जाणाऱ्या विजेपेक्षा कमी वीजवापर नोंदविण्याचा प्रयत्न करण्यात आला.

स्मार्ट मीटरमधून होणाऱ्या वीजवापराची नोंद अधिक अचूकपणे होत असल्याने अशा प्रकारची छेडछाड लपविणे ग्राहकांना कठीण झाले आहे. तपासणी पथकाने केलेल्या कारवाईत मीटरच्या रचनेत बदल करणे, सीटी प्रणालीला बगल देणे आणि वीजवापराची नोंद कमी करण्यासाठी विविध क्लृप्त्या वापरल्याचे प्रकार समोर आले. त्यामुळे स्मार्ट मीटर बसविल्यानंतरही वीजचोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर महावितरणने थेट कारवाईचा मार्ग स्वीकारला आहे.

### छेडछाड केली तर थेट फौजदारी कारवाई!

मीटरमध्ये छेडछाड करून वीजचोरी करणे, मीटरचे सील तोडणे, कव्हर उघडणे किंवा ‘सीटी बायपास’ करून वीजवापर कमी दाखविणे हा कायद्याने गंभीर गुन्हा आहे. अशा प्रकारांमध्ये केवळ अतिरिक्त वीजबिल किंवा दंड आकारून प्रकरण थांबविले जाणार नसून, भारतीय विद्युत अधिनियम २००३ मधील तरतुदींनुसार थेट फौजदारी कारवाई केली जात आहे.

चऱ्होली येथील शेतकरी फॅमिली रेस्टॉरंटमध्ये आढळलेला प्रकार तर अधिक गंभीर असल्याचे समोर आले. या व्यावसायिक वीजजोडणीच्या मीटरमध्ये छेडछाड करण्यासाठी रिमोट उपकरण बसविण्यात आले होते. या उपकरणाच्या माध्यमातून स्मार्ट मीटरच्या कार्यप्रणालीत हस्तक्षेप करून वीजवापराची नोंद प्रभावित करण्याचा प्रयत्न झाल्याचे तपासणीदरम्यान निदर्शनास आले. व्यावसायिक आस्थापनामध्ये अशा प्रकारे अत्याधुनिक पद्धतीने वीजचोरी करण्याचा प्रयत्न झाल्याने महावितरणच्या अधिकाऱ्यांनीही याची गंभीर दखल घेतली आहे.

भोसरी विभागातील १९ प्रकरणांपैकी नऊ प्रकरणांत आतापर्यंत गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणांमध्ये एकूण १२ लाख ४१ हजार रुपयांची दंडात्मक आकारणी करण्यात आली आहे. उर्वरित १० प्रकरणांमध्येही तपासणी पूर्ण करून दंडाची आकारणी तसेच संबंधितांविरोधात वीजचोरीचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

दिघी, कासारवाडी आणि रावेत पोलिस ठाण्यांमध्ये संबंधित ग्राहकांविरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. स्मार्ट मीटरमध्ये छेडछाड करून वीजचोरी करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर महावितरणने कठोर भूमिका घेतल्याने आगामी काळात अशा प्रकारांना आळा बसण्याची शक्यता आहे. स्मार्ट मीटरला ‘चकवा’ देण्याचा प्रयत्न केला तरी तो तपासणी यंत्रणेतून सुटणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून महावितरणने दिला आहे.